सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४६ | शुक्रवार, दि. २९ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४००००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २५९०/-
भाव प्रती १० ग्राम

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!

**दिनविशेष** २९ मे

- आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट दिवस

# शेतकी संघ निवडणुकीत हौशे-नौशे यांची यात्रा भरली की नेत्यांनीच भरू दिली...?

## तिरंगी लढतीत प्रतिष्ठेची झुंज; संस्थेचा आवाका लहान निवडणुकीला राजकीय रंग मात्र मोठा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सन १९२७ मध्ये स्थापन झालेला आणि पुढील वर्षी शताब्दी वर्षात पदार्पण करणारा अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ सध्या तिरंगी निवडणूक लढतीमुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. संस्थेची आर्थिक स्थिती खूप काही भक्कम नाही तरीही सदर निवडणुकीत असल्याचे चित्र असतानाही निवडणुकीत राजकीय शक्तिप्रदर्शनाला अधिक महत्त्व दिले जात असल्याची भावना सभासदांतून व्यक्त होत आहे.



### होऊ द्या खर्च, दुखू द्या अंग...!

राजकीय जाणकार व विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक बिनविरोध करणे सर्वपक्षीय नेत्यांना फारसे अवघड नव्हते. मात्र, त्यांनी मुद्दामच ही निवडणूक होऊ दिली आहे. कोणतीही निवडणूक लागली की हौसे- नौसे जणू स्वतःची योग्यता तपासून न पाहता तुटून पडतात. त्यांना समजावणे व आवरणे आता सर्वच पक्षीय नेत्यांना अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे हौशा- नौशांचा पैसा आणि घाम निघू द्या, त्यांना त्यांची योग्यता कळू द्या, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकांमध्ये इच्छुकांची संख्या थोडातरी कमी होईल. परिणामी, नेत्यांच्या डोक्यावरील ताणही कमी होईल. त्यामुळे नेत्यांनी "होऊ द्या खर्च, दुखू द्या अंग" अशी भूमिका घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही. संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीत बिनविरोध मार्ग निघू शकला नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेसाठी निवडणूक प्राधिकरण, पुणे येथे तब्बल १० लाख रुपये जमा करावे लागल्याची चर्चा रंगली आहे. यामुळे सहकाराच्या मूलभूत तत्त्वांपेक्षा राजकारणाचा प्रभाव वाढल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.तब्बल ४३ अंश सेल्सिअस तापमानात उमेदवार गावोगावी प्रचारासाठी फिरताना दिसत असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी उभी राहिलेली संस्था आज राजकीय रणांगण बनल्याचे चित्र आहे.

### अशी आहे तिरंगी लढत

१५ संचालक पदांसाठी एकूण ४४ उमेदवार रिंगणात उतरले असून निवडणूक पूर्णपणे तिरंगी झाली आहे.माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील आणि माजी आमदार साहेबरावदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) सहकार पॅनल ने सर्व १५ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. तर खासदार स्मिताताई वाघ यांच्या नेतृत्वाखालील भाजप प्रणित किसान विकास पॅनल ने १४ उमेदवारांना संधी दिली आहे. काँग्रेसच्या पाठबळावर प्रा. सुभाष सुकलाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रणित शेतकरी पॅनल कडून १० उमेदवार मैदानात आहेत. याशिवाय ५ अपक्ष उमेदवारही निवडणूक लढवत आहेत.

### पडदे के पिछे क्या है...?

विशेष म्हणजे, माजी आमदार शिरीषदादा चौधरी तसेच शिवसेना शिंदे गटाने व ठाकरे गटाने या निवडणुकीपासून अलिप्त भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या गटाकडून एकही उमेदवार देण्यात आलेला नाही. त्यामुळे तीन पक्षांच्या समर्थकांमध्येच मुख्य लढत रंगली आहे. जरी शिवसेनेच्या दोन्ही गटांनी तरी पडद्यामागे राहूनही काहींना ते काही उमेदवारांना शक्य तितकी मदत करतील तर काही उमेदवारांची समीकरणे त्यांच्याकडून बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.
संघाचे १६ हजार ३३२ व्यक्तिशः सभासद आणि १०७ सोसायटी सभासद ग्रामीण व शहरी भागात विखुरलेले असल्याने प्रचारासाठी उमेदवारांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर होत असलेल्या या निवडणुकीकडे संपूर्ण सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. दरम्यान, तिन्ही पॅनलमध्ये जुन्याच चेहऱ्यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आल्याने "एक व्यक्ती एक पद" या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तसेच तिरंगी लढतीमुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून आर्थिक उलाढाली वाढण्याचीही चर्चा रंगली आहे.

### आर्थिक स्थिती निराशाजनक नाही

दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघावर कोणत्याही बँकेचे एक रुपयाचेही कर्ज नाही. सध्या संघात सुमारे १२ ते १५ लाख रुपयांचे खत विक्रीसाठी उपलब्ध आहे. तसेच निवडणूक निधी म्हणून १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संस्थेतील चार कर्मचाऱ्यांचा पगार गोडाऊन भाड्यातून भागवला जात आहे. आर्थिक व्यवस्थापन फारसे भक्कम नसले तरी एकदम निराशाजनक ही नाही. यंदाची निवडणूक तब्बल दहा वर्षांनी होत असल्याने इच्छुकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. शेतकरी सभासदांना योग्य दरात खत व बियाणे उपलब्ध करून देणे, तसेच शासनाच्या खरेदी योजनांमध्ये पारदर्शकता राखणे यासाठी संचालक मंडळ सातत्याने प्रयत्नशील असल्याचे संबंधित मंडळी दावा करते आहे.

### निवडणूक लांबण्याची कारणे

२०१७ साली सुमारे ८,३२५ सभासद वगळण्यात आले होते. त्यानंतर त्यांचा पुनर्समावेश करण्यात आला. २०१९ पासून कोरोना महामारी, विविध निवडणुका आणि न्यायालयीन प्रकरणे व संघाच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद नसल्याने ही निवडणूक लांबणीवर पडली होती. सध्या संस्थेचे एकूण १६,३३२ सभासद असून त्यापैकी सुमारे ५ हजारहून अधिक सभासदांचे निधन झाले आहे.

(पान २ वर)

# गोष्ट साधी पण जबाबदारीची!

## सात वर्षांनंतर सुरळीत मिळाले पिण्याचे पाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रभाग आठ मधील एस टी कॉलनी, सुंदर नगर, पार्वती नगर, बँक कॉलनी आदी भागात नगरसेविकेने जबाबदारीचे कर्तव्य चोख पार पाडल्याने सात वर्षांनी नागरिकांना सुरळीत आणि योग्य प्रमाणात पाणी मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शहरातील पिंपळे रोड वरील प्रभाग आठ मधील शहराच्या बाहेरच्या टोकाला असलेल्या एस टी कॉलनी, सुंदर नगर, पार्वती नगर, बँक कॉलनी दोन या वस्तीत गेल्या सात वर्षांपासून पाणी पुरवठा होत नव्हता. दोन दोन तास मोटारी चालवून पाणी मिळत नव्हते. त्यात उन्हाळ्यात आठ ते दहा दिवसानंतर पाणी पुरवठा आणि वरून तापमानाचा कहर यामुळे नागरिक परेशान होते. पालिका कर्मचारी अधिकारी कोणीच लक्ष द्यायला तयार नव्हते. तांत्रिक दोषही आढळून येत नव्हता.



*अमळनेर : येथील प्रभाग आठ मधील एस टी कॉलनी, सुंदर नगर, पार्वती नगर, बँक कॉलनी आदी भागात पिण्याचे पाणी सुरळीत सुरु .*

अखेरीस या भागातील महिलांनी नगरसेविका अपूर्वा चौधरी याना तक्रार केली. त्यांनी व जालंधर चौधरी यांनी नगरपालीकेकडे पाठपुरावा केला. पाईपलाईन मध्ये दोष असतील तर नवीन होणाऱ्या २४ बाय ७ च्या पाईप लाईनला जोडण्या करा आणि त्यातून नागरिकांना पाणी पुरवठा करा असा पर्याय सुचवला. गोष्ट साधी होती मात्र त्यासाठी जबाबदारी स्वीकारायला तयार नव्हते. नगरसेविका अपूर्वा चौधरी यांनी ते काम करून दाखवले. चाचणी घेण्यात आली. अखेरच्या घरापर्यंत मुबलक पाणी पुरवठा झाला. तब्बल सात वर्षांनी नागरिकांना पुरेसे पाणी मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. याकामी लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ परीक्षित बाविस्कर, मुख्याधिकारी गणेश शिंदे, अभियंता सत्येम पाटील, प्रविणकुमार बैसाणे आदींचे सहकार्य लाभले.

# बळीराजाची डिझेलसाठी वणवण, वाळू माफियांकडील १०-१२ बॅरेल्स जप्त!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एकीकडे डिझेलच्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या तोंडावर शेती मशागतीची कामे (नांगरणी, रोटर) वेळेत करणे अशक्य झाले असताना मात्र दुसरीकडे वाळू उपसा करणाऱ्यांकडे चक्क १० ते १२ बॅरेल डिझेल आढळून आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.अमळनेर तालुक्यातील सावखेडा गावाजवळ तापी नदी पात्राच्या परिसरात महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाने वाळू माफियांवर केलेल्या कारवाईत बेकायदेशीरपणे साठवून ठेवण्यात आलेल्या डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.



या धडक कारवाईत पथकाने सुमारे १ हजार ४७० लिटर डिझेल जप्त केले असून, त्याची एकूण किंमत १ लाख ५५ हजार रुपये आहे.गोपनीय माहितीच्या आधारे २७ मे रोजी दुपारी महसूल आणि पोलिसांचे संयुक्त पथक तापी नदीकाठावरील वाळू डेपो परिसरात दाखल झाले. उपविभागीय दंडाधिकारी मयूर शिंगळे, तहसीलदार सुराणा, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, मंडळ अधिकारी कल्याणी पाटील आणि ग्राम महसूल अधिकारी पवन शिंगारे यांच्या उपस्थितीत ही धडक कारवाई करण्यात आली.पथकाने तापी नदीकाठावरील वाळू डेपो परिसराची कसून तपासणी केली. यावेळी झाडीझुडपात आणि डेपोच्या आडोशाला प्लास्टिकच्या ड्रममध्ये डिझेल लपवून ठेवल्याचे उघडकीस आले.

पंचांच्या उपस्थितीत तातडीने या जागेचा पंचनामा करण्यात आला. वेगवेगळ्या ड्रममधून एकूण १,४७० लिटर डिझेल जप्त करण्यात आले. कारवाईदरम्यान घटनास्थळी काम करणाऱ्या कामगारांची कसून चौकशी करण्यात आली. हा बेकायदेशीर डिझेल साठा अमळनेर येथील गिरीश तुलशीदास बेलदार यांचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. हा साठा पूर्णपणे बेकायदेशीर असल्याने महसूल विभागाने तो जप्त करून पुढील कारवाईसाठी अमळनेर पोलीस स्टेशन येथे जमा केला आहे.

अमळनेर तालुक्यामध्ये कडक नियमांचे कारण पुढे करत सामान्य शेतकऱ्यांना शेतीकामासाठी साध्या कॅनमध्ये डिझेल दिले जात नाहीये. नियमांवर बोट ठेवून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असताना, दुसरीकडे मात्र याच वाळू वाहतूकदारांना राजरोसपणे आणि मोठ्या प्रमाणात डिझेल थेट नदीपात्रात 'बॅरल'च्या बॅरल उपलब्ध आहे. यावरून इंधनाचा आणि काळ्या बाजाराचा मोठा साखळी गट तालुक्यात सक्रिय असल्याचे उघड झाले. दरम्यान या कारवाईनात फक्त डिझेलच नव्हे तर प्रशासनाकडून १० पोकलेन मशीन, १० डंपर आणि ६ बोटी जप्त करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीर डिझेल साठवणूक केल्याप्रकरणी संशयित आरोपी गिरीश बेलदार विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



आपको ना भूल पाएंगे...!

काळाचा महिमा काळच जाणे
कठीण तुमचे अचानक जाणे
आताही घुमतो स्वर तुमचा कानी
वाहताना श्रद्धांजली डोळ्यात येते पाणी
भावपूर्ण श्रद्धांजली

**ॲड. प्रदीप अरविंद भट**
मृत्यू : बुधवार, दि. २९ मे २०२६

आमचे सच्चे मित्र व मार्गदर्शक
क्रूर काळाने हिरावले,
आमचे कधीही भरून न निघणारे
नुकसान झाले...

**श्रध्देय ॲड. भट साहेब**



आता आपल्यात नसले तरीही त्यांचे
बहुमोल मार्गदर्शन व आर्शीवाद चिरस्मरणीय राहील
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो,
ही प्रभूचरणी प्रार्थना...!!

॥ शोकाकूल ॥
समस्त मंगळग्रह सेवा संस्था परिवार,
अमळनेर

## संपादकीय

# युद्धाने केली सुटका...

मेक इन इंडिया'च्या एका तपानंतरही आपली निर्यात वाढत नसेल, परिणामी रुपयाही लंगडत असेल तर त्याचे खापर केवळ लोकांच्या सोने इंधन तेल वापरावर कसे फोडणार?ज्याप्रमाणे भारताच्या २०१६ पासून सुरू झालेल्या अर्थघसरणीस 'कोरोना'ने बहाणा दिला त्याचप्रमाणे आधीच मंदावलेल्या आपल्या अर्थव्यवस्थेची गती विद्यमान इराणयुद्ध अधिक मंद करत आहे असे म्हटल्यास ते अजिबात वावगे ठरणारे नाही. आपले आर्थिक नाकर्तेपण झाकण्यासाठी पाच वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे कोविड साथ कामी आली त्याचप्रमाणे युद्धाच्या 'हिजाबा'खाली आपली आर्थिक धोरणधरसोड दडवण्याचा प्रयत्न होईल. तथापि त्या प्रयत्नांवर विश्वास ठेवून विचारशून्यावस्थेत कर्दमी लोळणार्या महिषींप्रमाणे आध्यात्मिक आनंद मिळवणार्यांस वगळून अन्यांसाठी आपले ढासळते वास्तव सादर करणे हे या प्रसंगी कर्तव्य ठरते. या कर्तव्याची जाणीव पूर्वी राजयक्ष्मा–बाधिताच्या दिवसागणिकच्या रोडावण्याप्रमाणे सध्या तासातासाला संकोचणारा रुपया करून देतो. ही रुपयाची घसरण पाहावत नाही. पण ती अपरिहार्य आहे आणि या अपरिहार्यतेस सध्याचे इराण युद्ध पूर्णांशाने जबाबदार नाही. त्याआधीपासूनच वर्षापेक्षा अधिक काळ रुपयाची संततधार सुरू आहे. व्यक्ती असो वा देश, त्यांवरील काही संकटांची तीव्रता काळानुसार कमी होते.

आपल्या अर्थव्यवस्थेबाबत सरकारी दृष्टिकोन हा असा होता. निवडणुकांत बाजी मारण्यासाठी नियामकांसह सर्व यंत्रणा मदत करतील, अमेरिकेशी व्यापार करार होईल आणि मग जगातील चवथ्या अर्थव्यवस्थेवर आकाशातून पावसाचा कृपाप्रसाद बरसून सर्व काही सुरळीत होईल असा विचार सरकारने केला नसेलच, असे नाही. पण 'अगली बार...'चा नारा देऊनही ट्रम्प आडवे आले आणि इस्त्रायलच्या नरसंहारी नेतान्याहू यांनी मध्येच युद्धाचा घाट घातला. रुपयाची इभ्रत वाचवण्यासाठी अवघ्या गेल्या चार महिन्यांत रिझर्व्ह बँकेने तीन हजार कोटी डॉलर्सचा खुर्दा केला. परिणाम परकीय चलनाची गंगाजळी विक्रमी ७३,००० कोटी डॉलरवरून ६९,००० कोटी डॉलर इतकी घसरली. पण रुपया सावरला नाही तो नाहीच. उलट आणखी घसरत गेला. त्यास पहिली गती दिली ती अमेरिकेच्या ट्रम्प यांनी. त्यांच्या आयातशुल्क वाढीचा दणका आपल्याला बसला. त्यापाठोपाठ नरसंहारी नेतान्याहूंमुळे वाहिलेल्या रक्ताच्या पाटाने रुपयांस आणखी घसरवले. वास्तविक हे ट्रम्प काय वा नरसंहारी नेतान्याहू काय, दोघेही आपल्या शासकांचे घनिष्ठ मित्र. पण त्या मैत्रीने रुपयास काही हात दिला नाही. तो बिचारा हेलपांडत राहिला. आज तर त्याने डॉलरच्या तुलनेत ९७ च्या मूल्यांगणात पाऊल टाकले.तज्ज्ञांच्या मते लवकरच तो शतकाचा विक्रम नोंदवून ऐतिहासिक टप्पा गाठेल. 'सोने खरेदी करू नका, खनिज तेल वाचवा' हे पंतप्रधानांचे आवाहन आले ते या पार्श्वभूमीवर. कारण दोन्हींची किंमत चुकवण्यासाठी डॉलर खर्च करावे लागतात. आणि ज्या वेळी डॉलरच्या तुलनेत रुपया घसरतो त्या वेळी पिंपभर तेलासाठी आपणास अधिक डॉलर वेचावे लागतात. तीच बाब सोन्याचीही. खरे तर ती खनिज तेलापेक्षाही गंभीर. कारण खनिज तेल आपल्या गरजेच्या ९० टक्के आयात करावे लागते; तर सोने १०० टक्के. म्हणजे भारतीय आभूषणातील बांगड्या– पाटल्या–तोडे आणि इतकेच काय मंगळसूत्रेही तयार होतात ती परदेशातून विकत आणलेल्या सोन्यातून.

एकेकाळी सोन्याची कौले वा सोन्याचा धूर इत्यादी इत्यादी होते/निघत होते त्या देशात गेल्या वर्षात ५२०० कोटी डॉलरचे सोने आयात झाले. वजनात हे ७२१ टन इतके भरावे. ही सर्व खरेदी डॉलरमध्ये झाली. म्हणजे त्या वजनाखाली आपला रुपया आणखी चेपला गेला. तो यापुढेही अधिक चेपला जाईल.यामागील साधे तर्कशास्त्र असे की ज्या ज्या वेळी नागरिकांचा– मग ते कोणत्याही देशांतील असोत – मायभूमीच्या चलनावर, मायदेशीच्या अर्थव्यवस्थेवर विश्वास कमी होतो वा उडतो त्या त्या वेळी त्या प्रदेशातील नागरिक आपली गुंतवणूक सोन्यात करतात. हे सत्य केवळ व्यक्तीलाच नव्हे; तर देशांनाही लागू पडते. म्हणूनच स्वित्झर्लंडसारख्या श्रीमंत देशानेही मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केले. म्हणजे जी बाब सरकार स्वत: टाळू शकत नाही, किंबहुना सरकारला स्वत:स जी गोष्ट संकट–समयी करावी लागते ती करू नका असे नागरिकांस सांगणे किती सयुक्तिक आणि प्रामाणिकपणाचे हा खरा यातील प्रश्न. ज्या काळात चलनवाढ अपरिहार्य आहे, त्यामुळे रुपयाचे मूल्य कमी होत जाणे अपरिहार्य आहे, जगणे अधिकाधिक महाग होत जाणे अपरिहार्य आहे, भांडवली बाजारातील अनिश्चितता अपरिहार्य आहे त्या काळात अशा प्रदेशातील नागरिकांस गुंजभरापासून ते काही तोळे सोन्यात आपल्या भविष्याची बेगमी करावी असे वाटणे, हेही तितकेच अपरिहार्य आहे. सबब खुद्द सरकारेच सोन्यात गुंतवणूक करत असताना आर्थिक स्थैर्याच्या शोधातील नागरिकांस सोने खरेदी करू नका असे सांगणे कितपत व्यवहार्य हा प्रश्न.त्याचे उत्तर डॉलर कमाईसाठी सरकारने स्वत: काय काय उपाय योजले याच्या तपशिलात आहे. 'मेक इन इंडिया' आदी चकचकीत कार्यक्रमाच्या एका तपानंतरही आपली निर्यात वाढत नसेल आणि परिणामी रुपयाही लंगडत असेल तर त्याचे खापर लोकांच्या सोने–इंधन तेल वापरावर फोडता येणार नाही. काही नाही तर अमेरिकेबरोबरचा लटकलेला व्यापार करार हा मुद्दा होता. आणि अजूनही आहे. खरी कारणे सांगण्यापासून सरकारची 'युद्धाने केली सुटका' हे जरी खरे असले तरी "अर्था'ने छळले होते' हे वास्तव बदलणारे नाही.

# 'संसद रत्न' पुरस्कारप्राप्त खासदार स्मिताताई वाघ यांचा सत्कार

## कमाल विक्री किंमत धोरणाविरोधातील आंदोलनाबाबत ग्राहक पंचायतीचे निवेदन



अमळनेर : प्रतिष्ठेचा 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांचा अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे जळगावात मंगळवार, दि. २६ मे रोजी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित ॲड. भारती अग्रवाल, सतीश देशमुख, मकसूद बोहरी यांच्यासह ग्राहक पंचायतीचे विविध पदाधिकारी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रतिष्ठेचा 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांचा अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे जळगावात मंगळवार, दि. २६ मे रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी ग्राहक हिताशी संबंधित विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात येऊन विशेषत: कमाल विक्री किंमत (एमआरपी) धोरणाविरोधात सुरू असलेल्या राष्ट्रीय आंदोलनाबाबत श्रीमती वाघ यांना निवेदन देण्यात आले.

प्रांत सचिव डॉ. अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने श्रीमती वाघ यांची भेट घेतली. या शिष्टमंडळात ॲड. भारती अग्रवाल, सतीश देशमुख, मकसूद बोहरी यांच्यासह ग्राहक पंचायतीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. प्रारंभी खासदारांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांना 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर २५ मे रोजी देशभरात सुरू करण्यात आलेल्या कमाल विक्री किंमत धोरणाविरोधातील आंदोलनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उत्पादनांवर कृत्रिमरीत्या वाढविण्यात येणाऱ्या कमाल विक्री किमतीमुळे ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप शिष्टमंडळाने केला. बाजारात अनेक वस्तूंवर उत्पादनखर्चाच्या तुलनेत जादा किंमत आकारली जात असल्याने सामान्य ग्राहकांना आर्थिक फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. ग्राहकांच्या हितासाठी केंद्र शासनाने कमाल विक्री किंमत निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, तसेच ग्राहकांची फसवणूक थांबविण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. खासदार वाघ यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून शिष्टमंडळाच्या मागण्यांची दखल घेतली. आगामी संसद अधिवेशनात या प्रश्नावर आवाज उठवून ग्राहकांच्या न्याय्य मागणीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# एन.सी.सी. प्रशिक्षण शिबिर कॅटसी–२०९ सुरू

## प्रताप महाविद्यालयात ३५६ छात्र सैनिकांना सैनिकी शिस्त व नेतृत्वाचे धडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयात ४९ महाराष्ट्र बटालियन अमळनेरच्या वतीने आयोजित एन.सी.सी. संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिर कॅटसी–२०९ उत्साहात सुरू असून २० मे ते २९ मे २०२६ या कालावधीत छात्र सैनिकांना सैनिकी शिक्षण, शिस्त, प्रशासन, एकता आणि नेतृत्वाचे धडे दिले जात आहेत. या शिबिरात ४८ महाराष्ट्र बटालियन धुळे, ४९ महाराष्ट्र बटालियन अमळनेर आणि ५० महाराष्ट्र बटालियन छत्रपती संभाजीनगर या तीन बटालियनमधील छात्र सैनिकांचा सहभाग आहे.



अमळनेर : कॅटसी –२०९ प्रशिक्षण शिबीरात शिबीरार्थीसह लेफ्टनंट कर्नल पिनाकी बनिक, कॅप्टन डॉ. भारतकुमार सपकाळ, कॅप्टन डॉ. प्रमोद चौधरी, लेफ्टनंट डॉ. राहुल जाधव आदी.

प्रताप महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात तब्बल ३५६ छात्र सैनिक सहभागी झाले असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सैनिकी प्रशिक्षणासोबत प्रशासन, शिस्त, प्रामाणिक आचरण, श्रमदान, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सामूहिक नेतृत्व विकसित करण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. राष्ट्रसेवा, जबाबदारीची जाणीव आणि संघभावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न या शिबिरातून केला जात आहे.

शिबिरासाठी प्रताप महाविद्यालयाने छात्र सैनिकांच्या राहण्याची व्यवस्था, कवायती व खेळांसाठी पटांगण, वर्गखोल्या तसेच नाट्यगृह उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे प्रशिक्षण शिबिर नियोजनबद्ध आणि सुव्यवस्थित पद्धतीने पार पडत असल्याचे दिसून येत आहे.

शिबिराचे संचालन ४९ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अमित रे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल पिनाकी बनिक, एएनओ कॅप्टन डॉ. भारतकुमार सपकाळ, कॅप्टन डॉ. प्रमोद चौधरी, लेफ्टनंट डॉ. राहुल जाधव आणि सेकंड ऑफिसर रोहन पाटील यांच्यासह परेड इन्स्ट्रक्टर स्टाफ शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

कॅम्पच्या यशस्वितेसाठी प्रताप महाविद्यालयाचे पदाधिकारी, खान्देश शिक्षण मंडळाचे पदाधिकारी तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांनी महाविद्यालयाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याने छात्र सैनिकांना उत्तम वातावरणात प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे एनसीसीच्या माध्यमातून शिस्त, नेतृत्वगुण आणि देशसेवेची प्रेरणा देणारे हे प्रशिक्षण शिबिर छात्र सैनिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# शेतकी संघ निवडणुकीत हौशे–नौशे यांची यात्रा भरली की नेत्यांनीच भरू दिली...?

पान १ वरून

**मालमत्तेवर सर्वांचीच नजर?**

धुळे रोडलगत असलेल्या संघाच्या मौल्यवान जागेवर सर्वांचा डोळा असल्याची चर्चा आहे. त्यामुळेच उमेदवारांची संख्या वाढल्याचे सांगितले जाते. मात्र, जाणकारांच्या मते सदर जागेवर वाईट दृष्टी असलेल्यांचे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही. सहकार कायद्यानुसार संस्थेची मालमत्ता विक्री करण्याचा अधिकार केवळ सर्वसाधारण सभेलाच आहे. एक जरी सभासदाने विरोध केला तरी सदर जागेच्या विक्रीस प्रतिबंध निर्माण होवू शकतो.

**चुरशीची लढत, बदलणारी समीकरणे**

प्रचाराच्या अंतिम टप्प्यात समीकरणे झपाट्याने बदलण्याची शक्यता आहे. मतदारांना अनेक प्रकारे आकर्षित करण्यासाठी विविध स्तरांवर हालचाली सुरू आहेत. परिणामी सदर निवडणुकीमुळे नेते व कार्यकर्ते यांचा भाव चांगलाच वधारला आहे.

**पुढे काय...?**

एकूणच, अमळनेर शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीत यंदा विक्रमी राजकीय रंग राजकीय रंग चढला आहे ही तिरंगी लढत कोणाच्या बाजूने झुकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विश्लेषकांच्या मते कोणतेही पूर्ण पॅनल विजयी होणार नाही काही अभ्यासू ,दमदार आर्थिक दृष्ट्या अति सक्षम व जनाधार असलेले उमेदवार आहेत त्यामुळे तीनही पॅनल मधून काही उमेदवार विजयी होतील मात्र सत्ता स्थापनेसाठी हे सर्व पुन्हा एकत्रित बसतील असाही कयास लावण्यात येत आहे.

# श्री पंच देवता मारोती मंदिरात १ जूनपर्यंत भागवत कथेचे आयोजन; वेळेत करण्यात आला बदल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील मिल चाळ, स्टेशन रोड परिसरातील श्री पंच देवता मारोती मंदिर येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भक्तिमय वातावरणात 'श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ समारोह' तसेच 'पुरुषोत्तम मास भागवत कथा' चे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि. २६ मे पासून सुरू झालेली ही कथा दि. १ जूनपर्यंत चालणार आहे. सध्या उन्हाची तीव्रता लक्षात घेता आयोजकांनी कथेच्या वेळेत बदल केला असून आता कथा दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत होणार आहे.

या बदलामुळे भाविकांना सायंकाळच्या वेळेत अधिक सोयीस्करपणे कथा श्रवणाचा लाभ घेता येणार आहे.

या धार्मिक सोहळ्यात कथाकार भागवताचार्य तथा ज्योतिषाचार्य हर्षलजी कुलकर्णी आपल्या अमृतमय वाणीमधून श्रीमद भागवत कथाचे निरूपण करीत आहेत. त्यांच्या प्रभावी कथनशैलीमुळे भाविकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून दररोज मोठ्या संख्येने भक्त उपस्थित राहत आहेत.

कथा दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून अधिक जेष्ठ शुद्ध १४, शनिवार दि. ३० मे रोजी कृष्णजन्म उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

तसेच सोमवार दि. १ जून रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत कथा सांगता होणार आहे. धर्मशाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास श्री छत्रपती श्री शिवाजी महाराज व्यायाम शाळा, मिल चाळ, अमळनेर यांचे अनमोल सहकार्य लाभत आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी सहकुटुंब, सहपरिवार व इष्टमित्रांसह उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री पंच देवता मारोती मंदिर, मिल चाळ, स्टेशन रोड परिसरातील आयोजकांनी केले आहे.

# कत्तलीसाठी आणलेल्या गोऱ्ह्यांच्या शेडवर पोलीसांचा छापा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कत्तल करण्याच्या हेतूने निर्दयीपणे दोन गोऱ्हे बांधून ठेवलेली असताना पोलिसांनी छापा टाकून संबंधित गोऱ्हे जप्त केले. ही घटना २४ मे रोजी दुपारी एक वाजता जपान जीनमध्ये रेल्वे पटरीच्या शेजारी घडली. रईस पठाण (रा. गांधलीपुरा) याने जपान जीनमधील पत्र्याच्या शेडमध्ये पंधरा हजार रुपये किमतीचे दोन गोऱ्हे आहेत, अशी माहिती पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना मिळाली.

त्यावरून त्यांनी पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, शरद काकळीज, विनोद भोई, चंद्रकांत पाटील, मंगल भोई व डीबी स्टाफ यांना कारवाईसाठी पाठविले. पोलिसांच्या पथकाने छापा टाकला असता दहा व बारा महिने वयाचे दोन गोऱ्हे आढळून आले. पोलिसांनी पंचनामा करून रईस शेख याच्याविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देणे प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. हवालदार अशोक साळुंखे पुढील तपास करीत आहेत.







हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# मसाला पान



# ‘पढ़ते-पढ़ते बूढ़ी हो गई, अब क्या नौकरी मिलेगी’

## बच्चों संग छोड़ा ससुराल, केव्हीएस टीचर बनीं ममता

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘सबने बोला कि इतने लोग फॉर्म भरते हैं, सालों से तैयारी कर रहे हैं, उनकी नौकरी लगती नहीं, तेरी लगेगी। एक बात ध्यान थी मुझे कि तारीफ दिन बनाती है और ताने जिंदगी बना देते हैं।’ आज जब ममता नागर केंद्रीय विद्यालय में बच्चों को पढ़ा रही होती हैं, तो कुछ देर के लिए भूल जाती हैं कि यहां तक पहुंचने के लिए उन्होंने अपनी लाइफ में क्या कुछ नहीं झेला है। दो छोटे बच्चों की परवरिश, ससुराल छोड़कर मायके में रहीं और पति से दूर रहना पड़ा। उनकी सक्सेस स्टोरी दृढ़ हौसले और खुद पर विश्वास की जीती-जागती मिसाल है।

**जहां आज भी लड़की की शादी पहले प्राथमिकता**

ममता नागर, हरियाणा के साधारण परिवार से आती हैं। उनकी परवरिश ऐसे समाज में हुई है जहां लड़कियों को पढ़ाया जाने तो लगा है लेकिन आज भी परिवार की पहली प्राथमिकता लड़की की जल्द से जल्द शादी ही होती है। पिता को बेटी की शादी की चिंता थी, लेकिन फिर भी उन्होंने कभी भी पढ़ाई में कोई कमी नहीं की। अच्छे स्कूल-कॉलेज में पढ़ाया। कंप्यूटर सिखाने के लिए अलग से कोचिंग कराई। उस समय कंप्यूटर सीखना बड़ी बात होती थी।

**शादी के बाद फिर से उठाई किताबें**

कॉलेज से निकलने के बाद साल २०१३ में ममता की शादी हो गई। परिवार की जिम्मेदारियां निभाते हुए पता ही नहीं चला कि कब किताबें हाथ से छूट गईं। ममता ने प्रसारमाध्यम से बात करते हुए बताया कि भले ही उन्हें परिवार का सपोर्ट नहीं मिला था, लेकिन पति ने हमेशा साथ दिया। उन्होंने फिर से पढ़ने के लिए कहा, हमेशा मोटिवेट किया। पति का सपोर्ट ही था, जिसकी वजह से उन्हें फिर से किताबें उठाने का हौसला मिला।

कॉलेज से निकलने के बाद साल २०१३ में ममता की शादी हो गई। परिवार की जिम्मेदारियां निभाते हुए पता ही नहीं चला कि कब किताबें हाथ से छूट गईं। ममता ने प्रसारमाध्यम से बात करते हुए बताया कि भले ही उन्हें परिवार का सपोर्ट नहीं मिला था, लेकिन पति ने हमेशा साथ दिया। उन्होंने फिर से पढ़ने के लिए कहा, हमेशा मोटिवेट किया। पति का सपोर्ट ही था, जिसकी वजह से उन्हें फिर से किताबें उठाने का हौसला मिला।

**कई परीक्षाओं में असफलता के बाद भी नहीं मानी हार**

एक तरफ परिवार और बच्चे व दूसरी तरफ कुछ बनने का सपना। दोनों जिम्मेदारियों को निभाते हुए ममता ने सरकारी नौकरी की तैयारी शुरू की। हरियाणा ग्राम सचिव, सीईटी और राजस्थान शिक्षक पात्रता परीक्षा (आरईईटी) में असफलता मिली। फिर भी उनके कदम डगमगाए नहीं। क्योंकि उन्हें पूरा यकीन था कि सफलता उनसे सिर्फ एक कदम दूर है।

**परिवार के ताने सहे, ससुराल छोड़कर मायके रहना पड़ा**

ममता बताती हैं कि जब भी कोई परिणाम आता और वो कुछ अंकों की कमी से चूक जाती तो उन्हें ताने सुनने पड़ते थे। उन्होंने बताया, ‘जब भी पेपर में फेलियर मिला तो ताने मिले। सबने बोला कि अब पढ़ाई छोड़ दो, बच्चों और घर पर ध्यान दो। पढ़ते-पढ़ते बूढ़ी हो गई हो, अब क्या नौकरी मिलेगी तुझे, अब अपना घर संभालो। फिर मैंने एक दिन घर छोड़ दिया। मायके चली गई ताकि वहां रहकर पढ़ाई कर सकूं। मां ने सहयोग किया। बच्चों की जिम्मेदारी ली। बच्चों को छोड़कर जाने का मन नहीं होता था। फिर भी दिल पर पत्थर रखकर मैंने लाइब्रेरी जाकर सेल्फ स्टडी की।’

**पुलिस की ड्यूटी निभाते हुए पति ने पूरा साथ दिया**

ममता नागर के पति हरियाणा पुलिस में कार्यरत हैं। पति के बारे में बताते हुए ममता कहती हैं कि वो भी पुलिस में नौकरी करते हैं और एक जिम्मेदारी भरी ड्यूटी निभाते हुए भी उन्होंने पूरा सपोर्ट किया। जब घर छोड़े हुए १ साल हुआ तो लोगों ने कहा कि अब बुढ़ापे में नौकरी नहीं मिलेगी। अपने घर आ जाओ, लेकिन पति ने बोला कि जब तक सफल न हो जाओ, घर की चिंता मत करना।

एग्जाम देने के लिए चाहे कितनी भी दूर जाना पड़े, पति वहीं ले जाते थे। कभी असफलता पर गुस्सा नहीं किया। हमेशा आगे बढ़ने की प्रेरणा दी। इस बीच ममता ने राजस्थान शिक्षक पात्रता परीक्षा क्वालिफाई कर ली। अब वे अपनी कामयाबी से एक कदम दूर थीं।

**फिर वो दिन आया, जब अपनी सफलता से तानों का जवाब दिया**

कई तरह की परेशानियों से लड़ते हुए ममता की जिंदगी में फिर वो दिन आया, जब उन्होंने अपनी सफलता से लोगों के तानों का जवाब दिया। साल २०२३ में उनका चयन केंद्रीय विद्यालय में पीआरटी टीचर पद पर हो गया। वर्तमान में ममता पीएम श्री केंद्रीय विद्यालय नंबर-२ जयपुर में पढ़ा रही हैं। वो कहती हैं, ‘लोगों के तानों ने ही मुझे आगे बढ़ाया और मजबूत बनाया है। उनके तानों ने ही मेरी जिंदगी बना दी। वो कहते हैं ना कि तारीफ दिन बनाती है और ताने जिंदगी बना देते हैं।’



# आरोग्यासाठी वरदान ‘लिंबू’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लिंबू हे आपल्या रोजच्या आहारातील फळ आहे. लिंबू जितके आंबट असते तितकेच ते आरोग्यवर्धक असते. लिंबामध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि फायबर, व्हिटॅमीन सी, बी-कॉम्प्लेक्स, कॅल्शिअम, आयर्न सामावलेले असतात. तसेच लिंबू आरोग्यासाठी वरदान आहे.

लिंबू पाण्यासोबत सेवन करणेच फायदेशीर आहे. कोमट पाण्यासोबत लिंबाचे सेवन करणे शरिराला फायदेशीर ठरते. दिवसाची सुरूवात लिंबू-पाणी घेऊन करावी. यामुळे त्वचा खुलून दिसते, पोटाशी संबंधित समस्या दूर होतात आणि अनेक इतर समस्यांपासून सुटका होते. लिंबात अनेक औषधी गुणधर्म असल्याने लिंबाचा वापर अनेक औषधांमध्ये केला जातो. अनेक आजारांत घरच्या घरी लिंबाचे उपाय केले जातात. लिंबू हे त्वचेशी संबंधित समस्या दूर करणारे नैसर्गिक अँटी सेप्टीक औषध आहे.

दात दुखत असल्यास त्या ठिकाणी लिंबू घासणे किंवा लिंबाचा रस लावणे, असे केल्याने दातांचे दुखणे थांबण्यास मदत होईल आणि दातांचे आरोग्य देखील निरोगी राहण्यास मदत होईल. तसेच लिंबाचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत.

हृदयरोग्यांसाठी लिंबू-पाणी रामबाण औषध आहे. यामध्ये भरपूर पोटॅशियम असल्याने उच्च रक्तदाब, मळमळ आणि भीती तसेच मानसिक तणावही दूर होतो. तसेच गळ्याचा संसर्ग दूर करण्यासाठी लिंबू गुणकारी आहे. गळ्याशी संबंधित समस्या किंवा टॉन्सिल्सची समस्या असल्यास लिंबामुळे खूप फायदा होतो.

जर तुम्हाला बुद्धकोष्ठतेचा त्रास असेल तर सकाळी उठून लिंबू-पाणी पिणे, असे केल्याने बुद्धकोष्ठतेचा त्रास कमी होईल आणि पचनक्रिया देखील सुधारेल. आयुर्वेदामध्ये लिंबाचे अनेक फायदे आहेत. शरीरात आयर्नची कमतरता असल्यास एनीमियाची समस्या उद्भवते आणि लिंबू एनीमियाची समस्या दूर होण्यापासून बचाव करते. लिंबू हे आजाराच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळवते.

लिंबाचे सेवन केल्याने किंवा लिंबाच्या रसाचे सेवन केल्याने वजन नियंत्रणात ठेण्यास मदत होते. कारण लिंबू मध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळून येतात जे वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.





# घामोळे कमी करण्यासाठी काय आहेत सोपे, घरगुती उपाय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घामोळे म्हणजे उष्णतेमुळे घामाची नलिका बंद होऊन त्वचेवर येणारे लाल बारीक पुरळ + खाज. हे मान, पाठ, छाती, बगल, कपाळावर जास्त दिसतात.

**१) थंडावा देणारे लेप**

कडुनिंब : पाने वाटून पेस्ट करा, १५ मिनिटे लावा आणि धुवा. आठवड्यातून २ वेळा. कडुनिंबाच्या पाण्याने आंघोळ केल्यास बॅक्टेरिया कमी होतात.

चंदन + गुलाबपाणी : चंदन पावडर गुलाबपाण्यात कालवून लेप लावा. १०-१५ मिनिटांनी धुवा. चंदन शीतल असते, जळजळ कमी करते.

मुलतानी माती : पाण्यात पेस्ट करून १५ मिनिटे लावा, मग थंड पाण्याने धुवा. आठवड्यातून ४ दिवस करा. बुरशी/बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखते.

कोरफड : गर थेट लावा. खाज आणि जळजळ लगेच कमी होते. दिवसातून कितीही वेळा लावू शकता.

काकडी : काप घामोळ्यावर ठेवा किंवा गर लावा. थंडावा मिळतो.

कच्ची कैरी : उकडून/भाजून गर काढा, फ्रीजमध्ये थंड करून लावा.

**२) लगेच आराम देणारे उपाय**

बर्फाचा शेक : कॉटन कापडात बर्फ गुंडाळून घामोळ्यावर लावा.

थंड पाण्याने आंघोळ : दिवसातून १-२ वेळा थंड पाण्याने अंघोळ करा. घाम पुसून टाका.

दही + बेसन : पेस्ट २०-२५ मिनिटे लावून धुवा.

**३) टाळायच्या गोष्टी + काळजी**

सैल सुती कपडे घाला : घाम शोषले जातात, घाम साचत नाही.

घाम सुकू देऊ नका : लगेच टॉवेलने पुसा.

खाजवू नका : इन्फेक्शन होऊ शकते.

तिखट-गरम पदार्थ टाळा : शरीरात उष्णता वाढते.

प्रिक्ली हीट पावडर/कालामाईन लोशन : खाज आणि लालसरपणा कमी करते.

**४) कधी डॉक्टरकडे जाल?**

घामोळ्यांचा त्रास खूप वाढला, पू झाला, ताप आला किंवा ३-४ दिवसांत बरे झाले नाही तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.


।। सहकारातून समृद्धीकडे ।।

कै. हरी आण्णा निंबाजी पाटील
कै. खुशाल यादव पाटील

अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ ली.
पंचवार्षिक निवडणूक 2025-30
वि.का.सोसायटी मतदारसंघातील सहकार पॅनलचे अधिकृत उमेदवार...

अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: भामरे गणेश धर्मराज — पोलीस पाटील, बाम्हणे, ता.अमळनेर; चेअरमन, बाम्हणे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. — निशाणी
अ.क्र. ५ — उमेदवाराचे नांव: पाटील नितीन बापूराव — संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; लोकनियुक्त सरपंच, गडखांब, ता.अमळनेर — निशाणी
अ.क्र. ६ — उमेदवाराचे नांव: पाटील पंकज शांताराम — लोकनियुक्त सरपंच, निमझरी, ता.अमळनेर; चेअरमन, निमझरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. — निशाणी
अ.क्र. ७ — उमेदवाराचे नांव: पाटील सचिन बाळू — संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; लोकनियुक्त सरपंच, अंतुर्ली-रंजाणे, ता.अमळनेर — निशाणी
अ.क्र. ८ — उमेदवाराचे नांव: पाटील संजय त्र्यंबक — संचालक, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चौबारी; कार्यवाहक, ग्रंथालय संघ, जळगाव — निशाणी

सोसायटी मतदारसंघात आपणास पाच मत देण्याच्या अधिकार आहे.
मतदान - शनिवार 30 मे 2026
स. 8.00 ते सायं. 04.00 पर्यंत
ठिकाण : साने गुरुजी शाळा अमळनेर
तरी..." कपबशी " चिन्हासमोरील बटन दाबुन प्रचंड बहुमतांनी विजयी करावे... ही नम्र विनंती...!

प्रकाशक : भागवत पाटील ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर; अशोक पाटील सभापती, कृ.उ.बा.समिती, अमळनेर; प्रा.सुरेश पाटील विधानसभा क्षेत्रप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेस,अमळनेर; सुनिल पवार मा.अध्यक्ष, आत्मा कमिटी, अमळनेर

अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ ली.
पंचवार्षिक निवडणूक 2025-30
व्यक्तिशा: मतदारसंघातील सहकार पॅनलचे अधिकृत उमेदवार...
कै. हरी आण्णा निंबाजी पाटील
कै. खुशाल यादव पाटील

सहकार पॅनल

अ.क्र. १ — बागूल दिपक जगतराव — माजी व्हा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (मंगरूळ) — निशाणी
अ.क्र. ६ — पाटील चंद्रकांत वसंत — माजी सरपंच, ग्रा.प. पिंगळवाडे (चकाअप्पा)(पिंगळवाडे) — निशाणी
अ.क्र. १० — पाटील संभाजी लोटन — मा.संचालक, कृ.उ. बाजार समिती, अमळनेर (लोण) — निशाणी
अ.क्र. १२ — पाटील संजय पुनाजी — मा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (पिंपळे) — निशाणी
अ.क्र. १७ — शिसोदे अनिल शिवदास — मा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (प्र.डांगरी) — निशाणी

महिला मतदारसंघ
अ.क्र. १ — देसले सुषमा वासुदेव — संचालिका, कृ.उ. बाजार समिती, अमळनेर (दहिवद) — निशाणी
अ.क्र. २ — पाटील मालुबाई बापुराव — गुणवंत पाटील यांच्या मातोश्री (झाडी) — निशाणी

ओ.बी.सी. मतदारसंघ
अ.क्र. २ — पाटील विक्रांत भास्कर — सेक्रेटरी, अमळनेर तालुका मराठा समाज (अमळनेर) — निशाणी

एस.सी./एस.टी मतदारसंघ
अ.क्र. १ — बैसाणे शंकर बंडू (बैसाणे सर) — निवृत्त मुख्याध्यापक, प्रताप हायस्कूल, अमळनेर (देवळी) — निशाणी

एन.टी. मतदारसंघ
अ.क्र. ३ — पाटील रणजित भिमसिंग — माजी शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अमळनेर (अमळनेर) — निशाणी

सन्माननीय मतदार बंधू-भगिनींना नम्र विनंती की, आम्ही अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ लि. अमळनेर पंचवार्षिक निवडणुक 2025-30 च्या निवडणुकीत सदस्य पदासाठी सहकार पॅनल तर्फे निवडणूक लढवीत आहोत... तरी आपले बहुमोल मत सहकार पॅनलच्या सर्व उमेदवारांच्या " कपबशी " या चिन्हाला फुलीचा शिक्का मारुन प्रचंड मतांनी विजयी करा ही नम्र विनंती.
शनिवार, 30 मे 2026 स. 8.00 ते सायं. 4.00 पर्यंत | ठिकाण : साने गुरुजी शाळा अमळनेर
प्रकाशक : भागवत पाटील ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर अशोक पाटील सभापती, कृ.उ.बा.समिती, अमळनेर प्रा.सुरेश पाटील विधानसभा क्षेत्रप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेस,अमळनेर सुनिल पवार मा.अध्यक्ष, आत्मा कमिटी, अमळनेर







ग्लोबल महातेज वृत्तसेवा

लक्ष्मी बंधन म्हणजे आर्थिक अडचणी, धनलाभात अडथळे, आणि अस्थिरता यांसारख्या समस्या होतात, असा समज आहे. अशा परिस्थितीत लक्ष्मी बंधन केलेले आहे की नाही हे ओळखण्यासाठी काही विशिष्ट संकेत किंवा लक्षणे आहेत.

१) **धनलाभात अडथळे :** अचानक पैशाची चणचण होणे, उत्पन्नात घट होणे, किंवा मिळालेले पैसे लगेच खर्च होणे. उसने परत न मिळणे. कर्ज वाढणे.
२) **अपयश :** कोणत्याही आर्थिक प्रयत्नात सातत्याने अपयश येणे. पनौती लागली आहे की काय असे वाटणे.
३) **घरगुती कलह :** घरात सतत आर्थिक कारणावरून वाद होणे.
४) **आरोग्य समस्या :** पैशाच्या अभावी आरोग्याचे प्रश्न वाढणे.

**लक्ष्मी बंधन निवारण उपायांची यादी**

१) **दुर्गा पूजन :** दुर्गा मातेला पूजावे आणि नियमितपणे दुर्गा सप्तशतीचे पाठ करावेत.
२) **महालक्ष्मी पूजन :** शुक्रवारच्या दिवशी महालक्ष्मीची पूजा करावी आणि त्यांच्या नावाचा जप करावा.
३) **व्रत आणि उपवास :** शुक्रवारचे व्रत ठेवा आणि उपवास करा.
४) **सकारात्मक वातावरण :** घरात स्वच्छता ठेवा, फुले आणि अगरबत्त्या वापरून सकारात्मक वातावरण निर्माण करा.
५) **दानधर्म :** गरजूंना अन्नदान, वस्त्रदान, श्रमदान आणि रक्तदान इत्यादी करा.
६) **कुलदैवत सेवा :** कुलदैवत खोलणे आणि कुलदैवताची कुळाचाराप्रमाणे सेवा, पूजा-अर्चा करणे.

हे उपाय नियमितपणे केल्यास तुम्हाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणार नाही आणि माता लक्ष्मी यांची कृपा प्राप्त होईल.


# अंबाबाई म्हणजेच पार्वती व प्रभावी शक्तीपीठ!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

## मग कोल्हापूरच्या अंबाबाईला महालक्ष्मी का म्हणतात?

कोल्हापूरचे अंबाबाई देवी मंदिर हे पौराणिक त्रिदेवींपैकी असलेल्या पार्वती किंवा लक्ष्मी यांचे नसून पराशक्तीस समर्पित आहे. आपण पार्वतीलाच आदिशक्ती मानत असाल तर हे मंदिर पार्वतीचे आहे, असे म्हणता येईल. ती जगन्माता तिच्या तमोगुणामुळे महाकाली तर सत्त्वगुणामुळे महासरस्वती होते, आणि मूळ राजसरूपात ती महालक्ष्मी आहे- सर्वस्वी शुभ लक्षणांनी युक्त आणि मंगलदायिनी. सर्व प्राण्यांत ती प्राणशक्ती रूपात स्थित आहे. याच्या उलट दारिद्र्य आणि अधोगतीकडे नेणाऱ्या अशुभ लक्षणांना पुराणात अलक्ष्मी म्हटले आहे.

ती सदाशिवाची शक्ती आहे. सदाशिव/परमशिव म्हणजे पौराणिक शंकर किंवा महेश नव्हे. भगवान शंकर सगुण असून केवळ संहाराची देवता आहे. सदाशिव निर्गुण, अचिंत्य परब्रह्म असून त्यांची पूजा केवळ लिंगरूपात केली जाते. कोल्हापूरच्या मंदिरातील मूळ विग्रहावर कोरलेल्या नाग आणि शिवलिंगातूनच देवीची ओळख स्पष्ट होते. शेषशायी विष्णू आणि ध्यानस्थ भगवान शंकर हेदेखील सदाशिवाची उपासना करतात. पौराणिक त्रिदेव परब्रह्माचीच कृती-विशिष्ट (सृष्टी-स्थिती-संहार करणारी) विस्ताररूपे असून, त्रिदेवी म्हणजे त्या-त्या रूपांच्या शक्ती होय. ब्रह्मांडपुराणातील ललितासहस्रनामात याचा



स्पष्ट उल्लेख आहे.

**सृष्टिकर्त्री ब्रह्मरूपा गोप्त्री गोविंदरूपिणी ॥ ६३**
**संहारिणी रुद्ररूपा तिरोधानकरीश्वरी ।**
**सदाशिवानुग्रहदा पञ्चकृत्यपरायणा ॥ ६४**

ललितासहस्रनामात मूळ प्रकृतीच्या म्हणजेच आदिशक्तीच्या १००० नावांपैकी महालक्ष्मी एक नाव आहेच. त्याचबरोबर सदाशिवपतिव्रता, शिवज्ञानप्रदायिनी, शिवशयैक्यरूपिणी, महाकैलासनिलया, पञ्चकृत्यपरायणा, पञ्चाशतपीठरूपिणी, श्रीचक्रराजनिलया अशी अनेक गूढ नावे या सहस्रनामात सांगितली आहेत. रमा, सरस्वती, सती, पार्वती, दुर्गा, उमा, गौरी ही सर्व महालक्ष्मीची रूपे आहेत, असे हे स्तोत्र स्पष्ट सांगते.

हे मंदिर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक आहे. महाराष्ट्रात महालक्ष्मी ही संज्ञा देवीसाठी पूर्वीपासून रूढ असून, गौरी-गणपतींच्या सणात ज्येष्ठा गौरीलाही महालक्ष्मी म्हणण्याची प्रथा पूर्वापार आहे. कारण गौरी/पार्वती आणि महालक्ष्मी या एकच आहेत.

अंबाबाईंच्या विग्रहावरील शिवलिंग वस्त्र आणि अलंकारांनी झाकून जात असल्याने त्याचे दर्शन घडत नाही. भाविकांना त्याचे दर्शन व्हावे या हेतूने यादव राजांनी १२ व्या शतकात अंबाबाई देवस्थानाच्या वर मातृलिंगाची स्थापना केली. मुख्य मंदिराच्या डावीकडे वरच्या मंदिरात जाण्यासाठी पायऱ्या आहेत; पण हा मार्ग महाशिवरात्री आणि श्रावण सोमवार सोडून पूर्ण वर्षभर बंद असतो.

महालक्ष्मीचे स्वरूप पौराणिक लक्ष्मीपुरते सीमित नाही हे स्पष्ट दर्शविणारी इतर तथ्ये

१) देवी विग्रहाच्या उजव्या हातात म्हाळुंग नावाचे फळ आणि डाव्या हातात वाटीसदृश पानपात्र आहे (मद्यप्राशन किंवा असुरांचे रक्त साठविण्यासाठी). इतर दोन हातांत गदा आणि खेटक ही आयुधे आहेत.

२) विग्रहाच्या खालच्या उजव्या अंगास देवीचा वाहन सिंह कोरलेला आहे.

३) महाकाळी मंदिराजवळ भिंतीत कोरलेले श्रीचक्र/श्रीयंत्र आहे. भारतात मोजक्याच पुरातन मंदिरांमध्ये दगडात कोरलेली श्रीयंत्रे आढळतात. कोल्लूरच्या मूकांबिका मंदिरात आणि कांचीपुरमच्या कामाक्षी मंदिरात अशी श्रीयंत्रे आहेत आणि ही दोन्ही देवस्थाने पौराणिक लक्ष्मीची नसून आदिशक्तीची आहेत.

४) पूर्वी अंबाबाईला पत्नी या नात्याने दरवर्षी तिरुपतीहून शालू भेट देण्यात येत असे. जो दसऱ्याच्या दिवशी नेसवण्यात येई. पण अंबाबाई म्हणजे पार्वती की लक्ष्मी हा वाद उद्भवल्यानंतर देवस्थान समितीने ही पद्धत बंद केली. विशेष म्हणजे ही पद्धत पूर्वापार चालत आलेली किंवा सनातन नसून केवळ काही वर्षे अस्तित्वात होती. तिरुपतीहून येणारा मानाचा शालू आता केवळ आई या नात्याने स्वीकारण्यात येतो. या सर्वावरून सिद्ध होते की कोल्हापूरचे मंदिर हे पौराणिक विष्णूपत्नी माता लक्ष्मींचे मुळीच नाही. ते त्रिदेवींचीही आई असलेल्या जगन्मातेचे आहे.

# घरामध्ये लक्ष्मी सदैव स्थिर राहण्यासाठी नियम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपण घरामध्ये घर झाडण्यासाठी जो झाडू वापरतो तो उभा ठेवायचा नसतो, झाडू आडवा करून ठेवायचा आणि तो आडवा ठेवताना झाडूचे तोंड दक्षिण दिशेस नसावे, झाडू हे लक्ष्मीचे प्रतीक आहे म्हणून ही काळजी घेणे गरजेचे आहे.

घरात जर मीठ सांडले तर ते मीठ कोणाच्याही पायाखाली येऊ देऊ नये ते स्वच्छ भरून घेऊन पाण्यात टाकून द्यावे, कारण मीठ समुद्रात असते, लक्ष्मी माता ही समुद्र कन्या आहे लक्ष्मी मातेचा आणि मिठाचा खूप जवळचा संबंध आहे त्यामुळे मीठ कधीही पायाखाली येईल असे ठेवू नये किंवा खाली पडू देऊ नये.



सायंकाळी म्हणजेच दिवे लागण्याच्या वेळेस पुढील तीन वस्तू कोणालाही देऊ नयेत. मीठ, झाडू आणि पैसे या तीनही वस्तू लक्ष्मी कारक आहे.

सायंकाळी लक्ष्मी येण्याची वेळ असते, घरातून लक्ष्मी (पैसे) बाहेर जाऊ देऊ नये. त्याचप्रमाणे दही, ताक, लोणी, दूध या वस्तू गाईपासून प्राप्त होतात, गाय ही लक्ष्मी आहे, म्हणून यादेखील वस्तू कोणालाही सायंकाळी देऊ नये. सूर्य मावळल्यानंतर घरातील कचरा, भाजीपाला, व इतर वस्तू उकिरड्यावर किंवा कचरापेटीत टाकू नये. बंद घड्याळ घरात लावू नये कारण त्याने आपली प्रगती थांबते.

**लक्ष्मी माता सदैव स्थिर राहण्यासाठी उपाय**

रोज सकाळी फरशी साफ करताना पाण्यात थोडे मीठ हळद आणि गोमूत्र टाकावे हे पाणी तयार करून मग फरशी साफ करावी, असे केल्याने घरातील नेगीटिव्हिटी दूर होते. घराच्या मुख्य दरवाजाचा उंबरा आणि दरवाजा रोज सकाळी स्वच्छ पुसून घ्यावा आणि त्यांची पूजा करावी असे केल्याने लक्ष्मी माता प्रसन्न होते. आपल्या घरातील देवघर नेहमी घराच्या ईशान्य कोपऱ्यात असावे. घरामध्ये तुटलेल्या वस्तू किंवा फाटलेले कपडे ठेवू नये. ते कपडे जाळून टाकावे. असे केल्याने घरातील नेगीटिव्हिटी (नकारात्मकता) दूर होण्यास मदत होते. प्रत्येक अमावास्येला माता लक्ष्मीला तांदळाची खीर नैवद्य म्हणून दाखवावी. असे केल्याने माता लक्ष्मी प्रसन्न होते, त्याचप्रमाणे प्रत्येक अमावास्येला दूध किंवा दुधापासून बनविलेला कोणताही पदार्थ दान करावा. कारण असे म्हणतात, की दुधापासून बनविलेली खीर दान केल्याने आपले पितर म्हणजे आपले पूर्वज तृप्त होतात. त्यामुळे आपल्याला लक्ष्मीप्राप्तीसाठी जे अडथळे येतात त्याचे मार्ग मोकळे होतात.

महादेवाच्या पिंडीवर उसाच्या रसाने अभिषेक करावा. असे केल्याने या घरात लक्ष्मी माता स्थिर राहते आणि आपल्यावर प्रसन्न होते. आपण आपल्या हाताची आणि पायांची नखे नेहमी मंगळवारीच काढावीत. आपल्या घरातील देवघरामध्ये श्री यंत्राची स्थापना करावी आणि त्यांची नियमित पूजा देखील करावी, श्री यंत्रामध्ये अष्टलक्ष्मी चा आशीर्वाद असतो. असे म्हणतात, की श्रीयंत्र माता लक्ष्मी आणि भगवान विष्णू यांचे आसन आहे आणि माता लक्ष्मी व भगवान विष्णू आपले आसन सोडून कधीच कुठे जात नाही. त्यामुळे आपण आपल्या घरात श्रीयंत्राची स्थापना केली तर भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी सदैव आपल्या घरात स्थिर राहतील, त्यांचा आशीर्वाद आपल्यावर राहील. आपल्या देवघरात आणि पूजेत माता लक्ष्मीचा आसनस्थ असलेला फोटो असावा. आपल्या घरातील स्त्री रूपी लक्ष्मीचा आदर करावा. मग ती आपली आई, बहीण, पत्नी, मुलगी कोणीही असू शकते. घरातील स्त्री जर आनंदी असेल तर आपल्या घरात सकारात्मकता राहते.

# पद्मिनी अर्थात कमला एकादशी व्रतपालन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




युधिष्ठिर महाराजांनी विचारले, " हे जनार्दन, अधिकमासाच्या शुक्ल पक्षामध्ये येणाऱ्या एकादशीचे नाव काय ? या एकादशीचे पालन कसे करावे ? आणि या एकादशीच्या पालनाने प्राप्त होणारे फल कोणते ते कृपया मला विस्ताराने सांगा." भगवान श्रीकृष्ण म्हणाले, " हे राजन, या पवित्र एकादशीचे नाव 'पद्मिनी अर्थात कमला एकादशी' असे आहे. जो या व्रताचे पालन करतो त्याला भगवान पद्मनाभांच्या धामाची प्राप्ती होते. या व्रताच्या पालनाने सर्व पापांचे क्षालन होते. ब्रम्हदेव देखील या एकादशीचे महात्म्य वर्णन करण्यास असमर्थ ठरतात."

पूर्वी एकदा नारदांना ब्रह्मदेवांनी व्रत धारण करणाऱ्याला मुक्ती आणि ऐश्वर्य आणि मुक्ती प्रदान करणाऱ्या पद्मिनी एकादशीचे माहात्म्य सांगितले होते, की ज्याच्या पालनाने भगवान केशव माझ्यावर प्रसन्न होतील आणि मला पुत्रप्राप्ती होईल जो एक पराक्रमी राज बनेल." पद्मिनीचे बोलणे ऐकून सती अनूसया प्रसन्न झाली आणि म्हणाली, " प्रत्येक ३३ महिन्यांनी एक अधिक मास येतो. या महिन्यामध्ये दोन एकादशी येतात. पद्मिनी आणि परम या एकादशीच्या व्रतपालनाने भगवंत लवकरच तुझ्यावर प्रसन्न होतील आणि तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील." भगवान श्रीकृष्ण पुढे म्हणाले, "अनसूयेच्या उपदेशानुसार पद्मिनीने या व्रताचे पालन केले. भगवान केशव या व्रतामुळे तिच्यावर प्रसन्न झाले आणि गरुडावर बसून तेथे आले. त्यांनी तिला वर मागण्यास सांगितले. प्रथम राणीने भगवंतांना वंदन करून प्रार्थना केली. त्यानंतर पुत्रप्राप्ती व्हावी यासाठी तिने विनंती केली. भगवान विष्णू म्हणाले, " हे साध्वी, मी तुझ्यावर प्रसन्न आहे अधिक महिन्याइतका कोणताही महिना मला प्रिय नाही. या महिन्यातील एकादशीही मला अधिक प्रिय आहे. तू मला प्रसन्न केल्यामुळे मी निश्चितच तुझ्या पतीची इच्छा पूर्ण करीन." पद्मिनीशी वार्तालाप झाल्यानंतर भगवंत कार्तविर्याकडे गेले आणि त्यांनी त्याला सांगितले, " तुझ्या पत्नीने एकादशी व्रत पालन केल्याने मी अतिशय प्रसन्न झालो आहे त्यामुळे तू तुझ्या इच्छेला येईल ते माग." राजाला अतिशय आनंद झाला. सर्वदा विजय प्राप्त करणारा बलवान असा पुत्र भगवंतांकडे मागितला. तो म्हणाला, " हे मधुसूदन, देवता, मनुष्य, नाग, राक्षस यांच्यापासून कधीही पराजित न होणारा पुत्र आपण मला द्यावा." हा वर देऊन भगवान श्रीकेशव तेथून अंतर्धान झाले.

पूर्ववत आपले शरीर प्राप्त करून राजा आणि पद्मिनी आपल्या ऐश्वर्यसंपन्न राजधानीमध्ये परतले. काही काळानंतर पद्मिनीने एका अतिशय पराक्रमी पुत्राला जन्म दिला. तो पुढे कार्तवीर्य अर्जुन म्हणून प्रसिद्ध झाला. त्याच्या इतका पराक्रमी योध्दा या जगामध्ये कोणीही नव्हता. त्याने दशमुखी रावणाला देखील पराजित केले." या सुंदर कथेचे वर्णन कथन केल्यानंतर पुलत्स्य मुनी तेथून निघून गेले. भगवान श्रीकृष्ण पुढे म्हणाले, " हे अनघ! अशाप्रकारे मी आपल्याला अधिकमासामध्ये येणाऱ्या एकादशींचे माहात्म्य सांगितले आहे. जो कोणी या व्रताचे पालन करतो तो निश्चितच वैकुंठात जातो."

### परमा, पद्मिनी किंवा कमला एकादशी

'परमा', 'पद्मिनी' किंवा कमला एकादशी ही अधिक मासात (पुरुषोत्तम मास) येणारी अत्यंत पवित्र आणि दुर्मिळ एकादशी आहे. दर तीन वर्षांनी एकदा येणाऱ्या या एकादशीला हिंदू धर्मात सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. 'कमला' हे माता लक्ष्मी यांचे नाव असल्याने या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची यांची एकत्रित पूजा केली जाते. कमला एकादशीचे महत्त्व विष्णू-लक्ष्मी कृपा : या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची उपासना केल्याने धन, सुख, समाधान आणि आध्यात्मिक शांती प्राप्त होते.

पापमुक्ती : हे व्रत केल्याने सर्व पापे नष्ट होतात आणि जीवनातील दारिद्र्य दूर होऊन समृद्धीचे मार्ग मोकळे होतात.

शुभ योग : अधिकमासाचे स्वामी स्वतः भगवान विष्णू (पुरुषोत्तम) असल्यामुळे या दिवशी केलेल्या भक्तीचे फळ अनेक पटींनी मिळते.

पूजा विधी आणि नियमांमध्ये सकाळची पूजा : सकाळी लवकर उठून स्नान करावे. भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांच्या मूर्तींना किंवा प्रतिमेला पिवळे फूल, फळे आणि नैवेद्य अर्पण करावा. मंत्र जप : पूजेच्या वेळी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा आणि 'श्रीसूक्त' किंवा विष्णुसहस्त्रनामाचा पाठ करणे अतिशय फलदायी मानले जाते.

उपवास : या दिवशी शक्य असल्यास निर्जला किंवा फलाहार करून उपवास करावा.

दानधर्म : एकादशीला अन्नदान, वस्त्रदान किंवा तुळशीच्या रोपाचे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते.

# कार्ला निवासिनी, शक्तीदायीनी एकविरा आई

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कार्ला निवासिनी, शक्तीदायीनी एकविरा आई महाराष्ट्राची आराध्य कुलदैवता, हाकेला धावणारी, नवसाला पावणारी. आई एकविरा म्हणजेच आदिमाता

रेणुका ही परशुरामाची माता. परशुरामाने आपल्या पराक्रमाने सर्वत्र कीर्ती मिळविली, म्हणून एका वीर पुत्राची आई म्हणजेच एकविरा माता होय. 'एकवीरेति विख्याता सर्वकामप्रदायिनी सह्याद्रिखंडता' असा उल्लेख सापडतो की भगवान शंकरांनीच आईला एकविरा हे नाव देऊन ठेवले आहे. आई एकविरेचे स्थान कार्ला गडावर स्वयंभू असून अतिशय प्राचीन आहे. आईंची मूर्ती स्वयंभू तांदळा दगडात प्रगटलेली 'शेन्दुर चर्चीत' आहे. आईचे नेत्र मिन्यापासून बनविलेले आहेत. आईचे रूप प्रसन्नकारी आहे. एकविरा देवी ही जलदेवता म्हणून प्रसिद्ध आहे.

आईच्या डाव्या हाताला आईची नणंद 'जोगेश्वरी देवीची' शेन्दुर चर्चीत मूर्ती आहे. अश्विन व चैत्र महिन्यात देवीच्या उत्सवाच्या यात्रा होतात. कोळी, आगरी, कुणबी, सोनार, कायस्थ, पाठारेप्रभू, चौकळशी, पाचकळशी, क्षात्रीय, वैश्य इत्यादी समाजांची आई एकविरा कुलस्वामिनी आहे. त्यामुळे ठाणे, मुंबई, रायगड व पुणे येथील लोकांची वर्षभर गर्दी असते. विशेष करून कोळी व आगरी समाजातील लोक वर्षभर आईच्या दर्शनासाठी येतात. जगभरातून भाविक आईच्या दर्शनाला येतात.

दिवसेंदिवस एकविरेच्या भक्तांमध्ये वाढ होत आहे. आईच्या मंदिराशेजारी 'प्राचीन बौद्ध इतिहासप्रसिध्द कार्ला लेणी' आहेत. येथील शिल्प चैत्यगृह, बौद्धशिल्पे, सिंहस्तंभादी शिल्पे, मुख्य गुंफा, सभा मंडप, उत्तुंग सिंहस्तंभ, स्तंभावरील शिल्पे, काष्ठकाम, भित्तीचित्रे, शिलालेखांसाठी या लेणी जगप्रसिध्द आहेत. त्यामुळे येथे वर्षभर पर्यटक लेणी पाहण्यासाठी आईंच्या दर्शनासाठी व येथील नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी आवर्जून येतात. इंद्रायणी नदी, विसापूर, लोहगड, तुगं हे नयनरम्य गड किल्ले कार्ला गडावर चढताना दृष्टीस पडतात. श्री एकविरा देवी विश्वस्त संस्थानच्या वतीने प्राथमिक सेवा-सुविधा पुरवीत गडावर अनेक सुधारणा केल्या आहेत.

आई एकविरेच्या भक्तांसाठी सदैव तत्पर असलेले श्री एकविरा देवी विश्वस्त संस्था प्रामाणिकपणे आईची सेवा समजून अहोरात्र भक्तांसाठी काम करत असते. संस्थेच्या वतीने गडावर यात्रा, पालखी, होमहवन, जागरण, गोंधळ, भजन, कीर्तन, व्याख्याने असे विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित केले जातात. आईच्या जगभरातील भाविकांसाठी विश्वदर्शन आईची वेबसाईट



बनविली आहे. त्यामुळे आईचे दर्शन अर्थात विश्वदर्शन झाले आहे. जगातून कुठूनही आईचे दर्शन घेणे आता सोपे झाले आहे. आई एकविरेच्या सर्व भक्तांना उदंड आयुष्य लाभो, हीच एकविरेचरणी प्रार्थना.

**विधी आणि दिनचर्या**

एकविरा आईचे मंदिर दररोज पहाटे पाच वाजता उघडले जाते. मंदिरात गुलाबजल, अत्तर, गोमूत्र शिंपडून स्वच्छ पवित्र वातावरण निर्माण केले जाते. तांदळा दगडात कोरलेली शेंदूर चर्चीत आई एकविरेच्या मूळ मूर्तीची पहाटे साडेपाच वाजता काकड आरती केली जाते, साडेसहा वाजता अभिषेकाला सुरूवात होते.

सुरूवातीला आईच्या डाव्या बाजूस असलेल्या जोगेश्वरी देवी (आईची नणंद) हिचा यथोचित अभिषेक केला जातो, मदिरात सर्वत्र उदबत्ती-धूप यांचा सुगंध पसरतो. घंटीचा नाजूक स्वर आणि सडोपचार एकविरा आईच्या मंत्राचा जप अशा मंगलमय प्रसन्नमय वातावरणात आई एकविरेच्या अभिषेकाला सुरूवात होते. आईला पंचामृताने सडोपचाराने अभिषेक केला जातो. अभिषेक झाल्यावर आईला नवीन वस्त्रे परिधान केली जातात. मग आईला सुवर्ण मुखवटा चढविला जातो. त्यानंतर आईला सुवर्णालंकाराने मढवले जाते. फुलांनी आईला सजवल जात सुगंधी चाफ्याच्या फुलांचा हार देवीला घातला जातो.

मोगरा-आबोलीच्या फुलांची आईला वेणी घातली जाते. आईचे साजशृंगार झाल्यावर आईची आरती केली जाते. आईचे सर्वविधी हे ब्राह्मणांच्या हस्ते होतात. आईचे ते प्रसन्न रूप पाहून मन अगदी उल्हसीत होते. मनात नवीन चैतन्य निर्माण होते. आलेल्या भाविकाचे नाव व गोत्र यांचा संकल्प सोडला जातो. कुणा भक्ताला स्वहस्ते अभिषेक करावयाचा असल्यास देवस्थानच्या माध्यमातून १०००/- (एक हजार) रुपयांची पावती फाडून भाविक स्वहस्ते अभिषेक करू शकतात.

सकाळी सहा वाजेपासूनच आईच्या दर्शनाला सुरूवात होते. आईला दुपारी एक वाजता महाप्रसाद नैवेद्य दाखविला जातो. सायंकाळी सात वाजता देवीची यथोचित आरती केली जाते. नंतर आईचा मुखवटा उतरवला जातो आणि मंदिर बंद केले जाते. सकाळचे सर्व विधी प्रथे-परंपरेप्रमाणे ब्राह्मणांच्या हस्ते होतात, देवीच्या गाभाऱ्याची देखभाल, देवीची ओटी भरणे, भाविकांनी आणलेली हार-फुले, भेटवस्तू देवीपर्यंत पोहोचविण्याचे काम तेथील स्थानिक गुरव मंडळी करतात. ही परंपरा फार पूर्वीपासून सुरू आहे.

**सदानंदाचा उदो उदो!**
**आदिमाऊलीचा उदो उदो!!**
**आई एकविरेचा उदो उदो!!**
**जय एकविरा!**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)